रोल नंबर :- 21

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

T.Y.B.A. अर्थशास्त्र, सेमिस्टर VI, व्यवसाय व्यवस्थापन-II, विषयासाठी सादर केलेला

# प्रकल्प अहवाल

जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे

## मारुतरावजी घुले पाटील, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,

अहमदनगर 414111

अर्थशास्त्र विभाग

A.Y. २०२३-२०२४

बहुजन हिताय I बहुजन सुखाय II

जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे

# मारुतरावजी घुले पाटील, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,

अहमदनगर 414111

(T.Y.B.A. अर्थशास्त्र, सेमिस्टर VI, व्यवसाय व्यवस्थापन-II विषयासाठी सादर केलेला)

# प्रकल्प अहवाल

***प्रकल्प विषय***

महाराष्ट्रातील साखर उद्योग

***विद्यार्थ्याचे नाव व वर्ग क्रमांक***

जाधव लक्ष्मी अंकुश वर्ग- T.Y.BA अर्थशास्त्र

***मार्गदर्शक***

प्रा. सु. बी. गुजर

**अर्थशास्त्र विभाग**

**A.Y. २०२३-२०२४**

# मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / कु.

लक्ष्मी अंकुश जाधव ........................................................ यांनी

साखर उद्योग प्रकल्प ..............................................................

..............................................................................................

.................................................हा संशोधन प्रकल्प माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. त्यांनी प्रकल्पासाठी माहिती मिळविण्यासाठी वापरलेल्या संदर्भ स्त्रोतांचा योग्य निर्देश या अहवालात करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधन कार्य समाधानकारक / असमाधानकारक आहे.

दि :- 03 / 04 / 2024

03-04-2024

प्रा. यु.बी.गुजर

**मार्गदर्शक**

डॉ. ए. आर.पाऊलबुध्दे

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

मारुतरावजी घुले पाटील, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,

# प्रतिज्ञापत्र

मी असे प्रतिज्ञापत्र लिहून देतो / देते की,

कु लक्ष्मी अंकुश जाधव

साखर उद्योग

हा प्रकल्प अहवाल माझे मार्गदर्शक

प्रा. यु. बी. गुजर सर

यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या प्रत्यक्ष कार्यावर आधारित आहे.

विद्यार्थ्याचे नाव जाधव लक्ष्मी अंकुश

विद्यार्थ्याची सही Laxmi

वर्ग:- TYBA अर्थशास्त्र

विषय :- व्यवसाय व्यवस्थापन Sem :- VI

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पान. नंबर |
|---|---|---|
| 1. | संशोधन प्रकल्प विषयाची प्रस्तावना | 1 |
| 2 | विषय निवडीचे समर्थन | 2 |
| 3 | संशोधन प्रकल्प विषय | 3 |
| 4 | संशोधनाचे महत्त्व | 4 |
| 5 | संशोधनाची उद्दिष्टे | 5 |
| 6 | संशोधनाची व्याप्ती | 6 |
| 7 | माहिती संकलन पद्धती | 8 |
| 8 | संशोधन विषय माहिती | 9 |
| 9 | निष्कर्ष | 16 |
| 10 | शिफारशी | 18 |

## 1] संशोधन प्रकल्प विषयाची प्रस्तावना


सदर प्रकल्पामध्ये साखर उद्योग हा विषय निवडला आहे. भारतातील साखर उद्योग हा अतिशय महत्वाचा कृषिवर आधारित उद्योग आहे. 1960 नंतर भारतात हरितक्रांती झाली याचाच एक परिणाम म्हणून पश्चिम महाराष्ट्रात बहुतांश क्षेत्रात जलसिंचन सुविधा निर्माण झाली. येथील जिरायती शेतीचे रुपांतर बागायती शेती झाले पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर या जिल्ह्यातील काही क्षेत्र ओलिता खाली आल्यामुळे ऊस क्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. शेतीवर आधारित उद्योगधंद्याचा ही विकास या ठिकाणी मोठ्या प्रमाणात होऊ लागला. जगात साखर उत्पादन करणाऱ्या देशामध्ये भारत दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्यातही पश्चिम महाराष्ट्रात साखर कारखान्यांचे जाळे पसरलेले असून स्थानिक अर्थकारण आणि राजकारण साखर उद्योग भोवती फिरत असते.

ऊस या पिकासाठी भरपूर कामगारांची गरज असते. यासाठी त्याची लागण, मशागत, काढणी, तोडणी, वाहतूक तसेच ऊस कारखान्यापर्यंत सहज पोहचविणे यासाठी कुशल कामगारांची गरज असते. यासाठी आवश्यक कुशल कामगार या ऊस उत्पादक परिसरात उपलब्ध नसल्याने इतर भागातून ऊसतोड कामगार स्थलांतर करून येतात व टोळ्या करून राहतात. यातूनच या कामगारांच्या सामाजिक व आर्थिक समस्यांचा प्रश्न निर्माण होतो. याच समस्यांचा अभ्यास करण्यासाठी अशाच 95 स्थलांतरित कुटुंबांची निवड केली व त्यांच्या सामाजिक व आर्थिक समस्या जाणून घेतल्या. ऊसतोड कामगारांच्या सामाजिक व आर्थिक समस्यांच्या अभ्यासासाठी प्रत्यक्ष निरीक्षण पद्धत, मुलाखत पद्धत व प्रश्नावली भरून घेण्यासाठी सुगम नमुना पद्धती या पद्धतींचा वापर करण्यात आला आहे.

## २. विषय निवडीचे समर्थन

स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या अभ्यास करण्यासाठी साखर उद्योग हा विषय निवडला आहे.

## Maharashtra



# ३. संशोधन प्रकल्प विषय

महाराष्ट्रातील साखर उद्योग.
विभागनिहाय साखर उद्योगाचे वितरण

1) पुणे विभाग
. पश्चिम महाराष्ट्रात साखर उद्योगाचे केंद्रीकरण, अहमदनगर, कोल्हापुर, सोलापुर, पुणे आणि सातारा हे अग्रेसर जिल्हे.

2) नाशिक विभाग
. तापी नदी खोरे, ऊस उत्पादनासाठी, साखर कारखाने धुळे, जळगाव, नंदुरबार येथे.

3) औरंगाबाद विभाग
. औरंगाबाद, लातूर, हिंगोली, बीड, परभणी नांदेड, जालना, उस्मानाबाद

4) ~~नागपुर विभाग~~ अमरावती विभाग
. यवतमाळ, बुलढाणा, अमरावती, अकोला, वर्धा नागपुर, वाशीम, भंडारा.

## ५. संशोधनाचे महत्त्व

1) जलसिंचनाच्या विस्तारामुळे ऊसाचे उत्पादनात वाढ.

२) साखरेसाठी लागणारा कच्चा माल ऊस हा तोडल्यानंतर वजनात घट होते म्हणून नाशवंत कच्चा माल आहे.

3) कारखान्यांची उत्पादन क्षेत्रातच स्थापना केली जाते.

४) अनुकूल हवामान, उपलब्ध बाजारपेठ, वाहतूक दळणवळण, भांडवल यामुळे साखर उद्योगात वाढ झाली.

5) खाजगी आणि सहकारी तत्त्वावर कारखान्यांची उभारणी

6) महाराष्ट्रातील सर्वात पहिला साखर कारखाना 1920 मध्ये जिल्ह्यात बेलापुर येथे उभारला.

# 5. संशोधनाची उद्दिष्टे

I. ऊसतोड कामगारांची सामाजिक परिस्थिती अभ्यासणे

1. ऊसतोड कामगारांचे स्थलांतर चक्र
2. कुटुंब व्यवस्था
3. घर व सोयसुविधा
4. सौचालय समस्या
5. स्त्रियांची समस्या
6. धर्म / मान
7. आरोग्य समस्या
8. व्यसन

II. ऊसतोड कामगारांची आर्थिक परिस्थिती अभ्यासणे.

1. मजूरी वेतन
2. स्थलांतरीताचा खर्च
3. इतर उत्पन्न साधने
4. आर्थिक समस्या

## 6. संशोधनाची व्याप्ती

हा उद्योग साखर उद्योगावर च आहे. हा उद्योग केवळ महाराष्ट्रातीलच आहे. द्वीपकल्पातील एकमेव असलेल्या महाराष्ट्र या राज्यातील सहकारी व्यवस्थेत साखर पिके आणि साखर कारखानदारी एकत्र आली आहे. आधिकारिक साखर उत्पादनाच्या आकडेवारीनुसार हा प्रांत देशाच्या इतर भागांपेक्षा चांगली कामगिरी करत आहे. भारताच्या एकूण साखर उत्पादनात त्याचा वाटा 40% पेक्षा जास्त आहे. नाशिक, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर ही प्रमुख शहरे आहेत.

साखर हे स्फटिकासारखे अन्न आहे त्याला साखर असे म्हटले जाऊ शकते त्यात प्रामुख्याने सुक्रोज, लॅक्टोज आणि फ्रुक्टोज असतात. मेंदला मानवी माणसाची चव त्यांच्या चवीमे गोड करण्यासाठी सांगितले जाते. साखर आणि पनीर हे साखर पाककृतीमध्ये सर्वात सामान्य घटक आहेत. हे फळे, मध आणि इतर विविध पदार्थांमध्ये देखील आढळू शकते.

महाराष्ट्रात साखर उद्योग हा कृषी-आधारित असा प्रमुख उद्योग मानला जातो. ग्रामीण भागातील सुमारे अडीच कोटी लोकांचे जीवन साखर उद्योगावर अवलंबून आहे. साखरेतून महाराष्ट्राला सुमारे 2200 कोटी रुपयांचा महसूल प्राप्त होतो. एका साखर कारखान्यामुळे ऊस लागवडीपासून साखर बाजारपेठेत पोहोचेपर्यंत सर्व प्रकारच्या प्रक्रियांमध्ये 5000 लोकांना थेट रोजगार उपलब्ध होतो. या आकडेवारीवरून

FOR EDUCATIONAL USE

# 7 माहिती संकलन पद्धती

महाराष्ट्रातील साखर उद्योग हा शेती आधारित असा प्रमुख उद्योग मानला जातो. साखर उद्योग या उद्योगाची माहिती दुय्यम पद्धती ची आहे. या प्रकल्पामध्ये ही माहिती इंटरनेटवर गेलेली आहेत इंटरनेटवर विकीपिडिया या वेबसाईटवर काही माहिती मिळाली आहे. त्याच बरोबर वसंतदादा सहकारी साखर कारखाना सांगली, जुगळे [2012], महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यातील ऊसतोड व वाहतूक कामगार Journeel Economic and social Development Vol, VII, No. 1, 2012 ISSN- 0973-886X. या वेबसाईटवर अधिकाधिक माहिती प्राप्त झाली. या सोबत पाटील स्थानांतरित ऊसतोड कामगारांची साधारणे स्थितीचा अभ्यास या सर्व दुय्यम पद्धतींच्या माध्यमातून मी हा प्रकल्प तयार केला आहे.


महाराष्ट्र साखर

# 4. संशोधन विषय माहिती

I. ऊसतोड कामगारांची सामाजिक परीस्थीती अभ्यासणे.

## 1. ऊसतोड कामगारांचे स्थलांतर चक्र

मराठवाड्यात कमी पर्जन्यप्रमाण असल्याने ऊस उत्पादन कमी आहे. त्यामुळे शेतकरी ऊसतोडीचा पर्याय निवडतो. एक माणूस कामाचा असेल तर अर्धा कोयता, दोन असेल तर पुर्ण कोयता तर समूह असेल तर टोळी ही संबोधने वापरली जातात. हा व्यवसाय पिढी बरोबर येतो. पारंपारिकता निर्माण होते. सहा महिन्यासाठी हे मजूर कारखान्यावर स्थलांतरित होतात. पुन्हा सहा महीने गावी परतात. कमी पावसामुळे शेती पिकत नाही. सिंचनाचे साधने नाहीत. रोजगारासाठी कारखाने उद्योग व्यवसाय नाही. हाताला काम नाही म्हणून हे स्थलांतर होते.

## 2. कुटुंब व्यवस्था

सर्वेक्षणातील ऊसतोड कामगारांच्या कुटुंब व्यवस्थेमध्ये एका कुटुंबात 4 ते 6 सदस्य संख्या असणाऱ्यांची संख्या सुमारे 50 % पेक्षा जास्त आहे. 1 ते 3 सदस्य संख्या असलेली कुटुंब संख्या 43 % पर्यंत आढळते, तसेच 6 पेक्षा जास्त सदस्य असणाऱ्यांची संख्या 7 % पर्यंत आढळली. सर्वेक्षणातून एकूण ऊसतोड कामगारांची एकत्र कुटुंब व्यवस्था असणाऱ्यांची संख्या 57 पेक्षा जास्त आढळून आली. तसेच विभक्त कुटुंबाची संख्या 43 % पेक्षा कमी असल्याचे आढळून आले.

3. घरे व सोयसुविधा

ऊसतोड कामगारांना राहण्याची सोय कारखान्याकडून केली जाते. कारखान्याकडून त्यांना 10 x 10 [10 फुट] जागा मिळते. कारखाना किंवा मुकादम हा करून राहण्यासाठी जागा ठरवून देतो व ठरल्याप्रमाणे 10 चटया 10 बांबू निवारा तयार करण्यासाठी कारखान्याकडून देतात. अशी माहिती त्यांच्याकडून मिळाली. तसेच झोपड्या, वडे ताडपत्री यांच्या सहाय्याने घरे बांधली जातात. पिण्याच्या पाण्याच्या समस्या खुप मोठ्या प्रमाणात भेडसावत असल्याचे दिसून येते. पाणी काही ठिकाणी, विहिरी, नद्या अथवा कूपनलिका यांचे वापरतात. सर्वेक्षणाच्या ठिकाणी ऊसतोड कामगार कूपनलिका आणि ग्रामपंचायत मार्फत पुरवठा जाणारा पाणिपुरवठा यांचा वापर पिण्याच्या पाण्यासाठी व घरगुती वापरासाठी करतात.

4. सौचालय समस्या

सर्वेक्षण क्षेत्रात बहुतांश ऊसतोड कामगार शौचालयास उघड्यावरच जातात. वसंत दादा साखर कारखान्याच्या क्षेत्रात असणाऱ्या ऊसतोड कामगारांना शौचालयास उघड्यावर जाणे चुकीचे वाटते. विशिष्ट ठिकाणीचे हे लोक शौचालयास जातात. आजूबाजूच्या परिसरातून मात्र याविषयी तक्रारी नाहित. तर समडोळी परिसरातील कामगारांना उघड्यावर जाण्यासाठी देखील खुप अडचणी येतात. ज्या शेतांमध्ये उघड्यावर शौचालयास बसलेले असतात तेथे शेतमालक दगडे मारून उठवतात.

5. विजेची समस्या

साखर कारखान्याच्या शेजारी ऊसतोड कामगारांना राहण्यासाठी दिलेल्या आमांमध्ये विजेची सोय नसते. ऊसतोड कामगार ऊसतोड हंगामामध्ये मूळगावाहून ज्या ठिकाणी जातात त्या ठिकाणी ते स्वत: विजेची सोय करू शकत नाही. कारखान्याकडून विजेची सोय होत नाही. तसेच मुकादमही विजेची सोय करून देत नाहीत काही कुटुंबामध्ये सौरऊर्जेवर चालणारे दिवे, कंदील, रॉकेलचा दिवा, बॅटरी व उपकरणे वापरतात. ऊसतोड कामगार हे स्वखर्चाने सूर्यप्रकाशाची बॅटरी किमान 400 ते 500 ने विकत घेतात. आधुनिक काळात मोबाईलचा वापर वाढल्याने कारखान्यांचे ठरवून दिलेल्या दुकानात जाऊन स्वत:च्या मोबाईलची बॅटरी चार्ज करावी लागते. त्या दुकानमालकास एकावेळी मोबाईलची बॅटरी चार्ज करण्यासाठी 5 रु. द्यावे लागतात. या सर्वेक्षणात ऊसतोड कामगारांच्या घरी विजेची सोय नाही असे आढळून आले. त्यामुळे विजेची विविध उपकरणे बाजारामधून स्वखर्चाने प्राप्त करावी लागतात.

6. ~~शारीरिक~~ / ~~मान~~ आरोग्य समस्या

ठराविक व विशिष्ट वेळेत या कामगारांना काम मिळत नाही, त्यामुळे कामगारांना पहाटे 3 वाजता उठून ऊसतोडीच्या कामासाठी बाहेर पडावे लागते. तेव्हापासून दुपारी 3 वाजेपर्यंत काम करावे लागते. म्हणजे तब्बल 12 ते 14 तास काम करावे लागते. यामुळे झोप पूर्ण होत नाही. यासाठी शरीराला जागे ठेवण्यासाठी येथील कामगार व्यसन लावून घेतात. रात्री मध्यरात्री गाडी नंबर लावावा लागतो. झोप न झाल्यामुळे

FOR EDUCATIONAL USE

II. ऊसतोड कामगारांची आर्थिक परिस्थिती अभ्यासणे.

1. <u>मजुरी वेतन</u>

ऊसतोड कामगारांची मजुरी ही एकसारखी न रहता ती टनावर ठरते. कारखाना 635 रुपये प्रत्येक टनासाठी या दराने मजुरी देतो. कामगारांना साखर कारखान्यामार्फत भत्ता मिळत नाही. ऊसतोड कामगारांच्या मजुरीत दरवर्षी वाढ होत नाही, परंतु करारामार्फत दर तीन वर्षांनी मजुरीत वाढ होणे आवश्यक आहे. परंतु एखादे कारखान्या-मध्येच मजुरीत वाढ करून दिली जात होती. मात्र आता बरीच वर्षे झाली तरी ऊसतोड कामगारांच्या मजुरीत वाढ झाली नाही.

2. <u>स्थलांतरीताचा खर्च</u>

साखर कारखानदारीत महाराष्ट्र आघाडीवर आहे. या साखर कारखानदारीत मधील एक कळीचा घटक म्हणजे ऊसतोड कामगार होय. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांतील सुमारे 8 लाख दरवर्षी पश्चिम महाराष्ट्र, कर्नाटक वगैरे भागात ऊसतोडीसाठी स्थलांतर करतात. या मराठवाडा आणि त्यातही बीड जिल्हा आघाडीवर नवरा-बायको दोघेही स्थलांतर करतात. अशी एक जोडी म्हणजे एक कोयता असे लाखो कोयते ऊसतोडीसाठी राबतात. त्यांना मूळ ठिकाणावरून कारखाना क्षेत्रात येई पर्यंतचा खर्च हा मुकादमाकडून केला जातो. पण काही वेळेस मुकादमाने दिलेले पैसे वाहतुकीसाठी पुरत नसल्याचेही काही ऊसतोड कामगारांनी सांगितले.

FOR EDUCATIONAL USE

## ३. इतर उत्पन्न साधने

ऊसतोड कामगार हे त्यांच्या बरोबर स्वतःची जनावरे घेऊन येतात. बैल, म्हैस, शेळी, गाय, घोडा, कोंबड्या इ. जनावरे आणली होती. कामगारांना ऊसतोडीतून मिळालेले वाडे विकतात. ऊस तोडल्यानंतर मिळालेले वाडे 1 किंवा 2 रु दराने पेंड्या विकतात. काही वेळा हे वाडे त्यांना 50 रुपये शेकडा या दराने किंवा या पेक्षा कमी दरात द्यावे लागते. जनावरांकडून मिळणारे दूध ते विकतात. दूध व्यवसाय हा त्यांचा जोड व्यवसाय आहे. ऊसतोड कामगार हे दुष्काळी भागातून येत असल्यामुळे तेथे जनावरे ही स्वस्त दरात मिळतात. येथे जनावरांच्या किमती जास्त असल्याने ते आपली जनावरे जातांना येथे जास्त किमतीत विकून जातात. यामधूनही त्यांना भरपूर पैसा मिळतात.

## ४. आर्थिक समस्या।

ऊस तोडण्यामुळे झालेल्या अपघात मुकादम किंवा कारखाना मदत करतात का ? या प्रश्नांची वेगवेगळी ठिकाणी वेगवेगळी उत्तरे ऐकण्यास मिळाली. प्रत्येकाचा अनुभव हा वेगवेगळा होता. काही कामगारांकडून असे ऐकण्यास मिळाले की या कारखान्यांमध्ये अपघात झाल्यानंतर कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत केली जात नाही. त्यामुळे अशा वेळी हे कामगार स्वतः जबाबदारी ऊसतोड करत असतात. काही ठिकाणी कारखाना व मुकादम मदत करताना असे त्यांचे उत्तर मिळाले.

अपघात हा लहान असेल तर कारखाना किंवा मुकादम कोणतेही मदत करत नाही. स्वतःचा खर्च, दवाखान्याचा खर्च

स्वत: चा स्वत: करावा लागतो. मुकदम हा ~~क~~ ४
श्रीवनिकरीच्या जर जवळचा असेल तर ~~कारखाना~~ तत्त्व
तो थोडीफार मदत करतो. अपघात मोठा असेल तर
त्याची भरपाई कारखाना करतो. समजा गाडीचे
काही नुकसान झाले तर तो खर्च कारखाना
करतो. तसेच माणूस दगावल्यास त्याचा खर्च भरपाई
कारखाना उचलते. समजा बैलगाडी असेल अपघातांमध्ये
बैलांना काही झाल्यास अथवा दगावल्यास भरपाई म्हणून
प्रत्येक बैलावर 60000 रुपये भरपाई मिळते. ट्रॅक्टर ट्रक
असे जर वाहन असेल तर त्याची भरपाई कारखाना
करतो.

ऊस तोडीतील कामगारांची टोळी ऊस तोडीला
येताना त्यांच्या प्रती टोळी वर 1000 रुपयाचा विमा
उतरविला जातो. तर काही ठिकाणी 735 रुपयाचा विमा
देखील उतरविला जातो. हे विमा उतरविण्याचे प्रमाण जास्त
दिसून आले. या विम्याची जी काही रक्कम असेल ती
त्यांना दिलेल्या उचली मधून कापून घेतली जाते. याच
विम्यातून अपघाताचा खर्च भागविला जातो. काही
कारखान्यांमध्ये हा विमा देखील उतरविला जात नाही.
अशावेळी अपघाताचा सर्व खर्च स्वत: कामगारास
करावा लागतो.

## ७. निष्कर्ष

कारखान्याशी संलग्न असणारे ऊसतोड कामगार हे कारखान्याचा अविभाज्य घटक आहेत. या ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण व अभ्यास केल्यानंतर काही निष्कर्ष काढता येतील. वसंतदादा सहकारी साखर कारखान्यात महाराष्ट्रातील अन्य अवर्षणप्रवण क्षेत्रातून येणाऱ्या हंगामी ऊसतोड कामगारांमध्ये बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगार हे सर्वाधिक आहेत. हवामान हा घटक त्यांच्या स्थलांतराचे महत्त्वाचे कारण आहे. याशिवाय पर्यायी उत्पन्नाच्या साधनांचा अभाव हे देखील कारण आहे.

साखर कारखान्याशी असलेले संलग्न असणारे ऊसतोड कामगार हंगामी मजूर म्हणून येथे राहत असताना त्यांची सामाजिक स्थिती ही राहण्याची सोय, शिक्षणाची सोय, पाण्याची सोय, स्नानगृह, शौचालय, आरोग्याच्या सोय सोई, महिलांविषयीच्या समस्या, व्यसन दिली जाणारी वागणूक इ. मुद्द्यांच्या आधारे अभ्यासली.

बहुतांश कुटुंबातील व्यक्ती अशिक्षित असल्याने पर्यायी नोकरीच्या संधी उपलब्ध नसल्याने कुटुंबातील सर्व व्यक्ती या ऊसतोडीच्या व्यवसायात असलेले आढळून आल्या. कुटुंबातील प्रमुख व्यक्तीच अशिक्षित असल्याने त्यांना शिक्षणाचे गांभीर्य नसल्याने दिसून आले, परिणामी कुटुंबातील सर्वच व्यक्ती अशिक्षित असून याच व्यवसायात गुंतल्याचे दिसून आले.

काही कुटुंब परंपरेने या व्यवसायात दिसून आले. कारण मुकादमाकडून घेतलेली उचल ही ऊसतोडीच्या हंगामात न फेडल्यामुळे पुढील वर्षी ही उचल फेडण्यासाठी कुटुंबातील

## 10. शिफारशी

ऊसतोड कामगारांना कारखान्याचे स्थलांतरित कामगार न समजता कायमस्वरूपी कामगार म्हणून स्वीकारावे.

कामगारांचे वेतन वाढविले पाहिजे.

ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी साखर शाळेची सोय व्हावी.

ऊसतोड कामगारांच्या मूलभूत सोय-सुविधा पुर्तता करण्यात याव्या.

साखर कारखान्याजवळ दवाखान्याची सोय होणे गरजेचे आहे.

ऊसतोड कामगारांना वृद्ध वयात उदर निर्वाह होण्यासाठी निवृत्ती वेतनाची सोय व्हावी.

7. ऊसतोड कामगारांना विम्याची उपलब्धता व्हावी किंवा मोफत सौर दिवे मिळावेत.

8. कारखान्याकडून त्यांना गरजेपुरते रेशन मिळावे.

9. त्यांना साखर कारखान्याकडून किमान साखर मिळावी.

# ११. संदर्भसूची


1. शेंडे बाळासाहेब [2015] ऊसतोड कामगारांची सामाजिक आर्थिक पार्श्वभूमी आणि हंगामी स्थलांतर IJHSS.
2. जुगळे [2012]: महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यातील ऊसतोड व वाहतूक कामगार Journal Economic and Social Development, Vol, VII, No. 1, 2012 ISSN - 0973 - 886 X
3. वसंतदादा सहकारी साखर कारखाना सांगली.
4. पाटील एन. एम. [2012] महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या साधारण स्थितीचा अभ्यास.

# ऋणनिर्देश

हा प्रकल्प लिहिताना मला मी मिळवलेली साखर उद्योगाची माहिती इंटरनेटवरून घेतली आहे. विकीपिडीया, वसंतदादा सहकारी साखर कारखाना सांगली पाटील पान, पान, 2012] महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील स्थलांतरित असंघटित कामगारांच्या साखरेची स्थितीचा अभ्यास केंद्र बाळासो [2015] असंघटित कामगारांची सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी आणि हंगामी स्थलांतर IJHSS. शाम बरोबर गुगळे [2012] महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यातील असंघटित व वाहतूक कामगार Journal Economic and social Development Vol, VII, No 1, 2012 ISSN - 0973 - 886X ही माहिती या सर्व वेबसाईडवरून घेतली आहे.

हा प्रकल्प लिहिताना व्यवसाय व्यवस्थापन या विषयाच्या शिक्षकांनी मला मदत केली आहे.

विद्यार्थ्याचे नाव :- जाधव लक्ष्मी अंकुश